# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी, मुंबई.

(महाराष्ट्र होमिओपॅथी वैद्यकीय अधिनियम १९६० अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे गठीत)

२३५, पेनिन्सुला हाऊस, ३रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. : +९१-२२-२२७० ४४०० • फॅक्स : +९१-२२-२२७०३०८६

ई-मेल : mail@mchmumbai.org • संकेत स्थळ : www.mchmumbai.org

**डॉ. सोमनाथ त्रिंबक गोसावी**
**प्रशासक**
(९८२०८९३४०४)
ई-मेल : somnath_gosavi@yahoo.com


क्र. महोप-अस्था-२०२२ 19560९ — दि. २२ ऑगस्ट २०२२

प्रति,

मा. कुलसचिव, — **तातडीचे**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ,
वणी-दिंडोरी रोड,
म्हसरुळ, नाशिक ४२२ ००४

**विषय – शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता आधुनिक वैद्यक होमिओपॅथिक व्यावसायिकांच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या ना-हरकत प्रमाणपत्राबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता आधुनिक वैद्यक होमिओपॅथिक व्यावसायिकांच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी लागणारे ना-हरकत प्रमाणपत्र महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेकडून प्रदान करण्यात येते. परंतु मागील आठवडयात दि. १३ ऑगस्ट २०२२ते १६ ऑगस्ट २०२२ आणि दि. १९ ऑगस्ट २०२२ ते २१ ऑगस्ट २०२२ दरम्यान शासकीय सुटी असल्याने तसेच बॅकेचा डेटा कार्यालयात प्राप्त न झाल्याने अर्जधारकांना ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यास अडचणीचे येत आहे.

परिषदेकडून ज्या अर्जधारकांचे पेमेंट बॅकेकडून जमा झाल्याचे आढळून येते, त्यांना त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी ना-हरकत प्रमाणपत्र ई-मेल व स्पीड पोस्टाद्वारे पाठविण्यात येत आहे. परंतु बॅकेच्या व शासकीय सुटीमुळे काही अर्जधारकांना पेमेंट जमा न झाल्याने अडचणीचे होत असल्याने अनेक तक्रारी परिषदेला प्राप्त झाल्या आहेत.

आपणाकडून दि. २२ ऑगस्ट २०२२ ही आधुनिक वैद्यक होमिओपॅथी व्यावसायिकांकरिता ठेंवलेली अंतिम मुदत असल्याने, वैद्यकीय व्यावसायिक या संधीपासून वंचित राहू नयेत याकरिता आणखी ८ दिवस वाढवून द्यावी अशी अर्जधारकांकडून वारंवार मागणी होत असल्याने कृपया आणखी ८ दिवस मुदतवाढ मिळावी ही नम्र विनंती.

धन्यवाद,

आपला विश्वासू,

(डॉ. सोमनाथ त्रिं. गोसावी)
प्रशासक
महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY • MUMBAI

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel:(0253) 2539191/2539291 ☎ Student Helpline:0253-2539111/6659111/100
Website: www.muhs.ac.in, E-mail: academic1@muhs.ac.in
MUHS

डॉ. संदीप सिताराम कडू
एम.बी.बी.एस.,एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र),
एम.बी.ए., पी.जी.डी.एच.एच.एम.,पी.जी.डी.एम.एल.एस., सी.एफ.एम.जे.
प्र.कुलसचिव तथा
परीक्षा नियंत्रक

Dr.SandeepSitaramKadu
M.B.B.S.,M.D.( Forensic Medicine),
M.B.A., P.G.D.H.H.M., P.G.D.M.L.S., C.F.M.J.
Offg. Registrar &
Controller of Examinations

जा.क्र. मआविवि/युजी/ई-१ /३०३१/२०२२

दि.२२/०८/२०२२

## कार्यालयीन परिपत्रक क्र.८१/२०२२

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता आधुनिक वैद्यक होमीओपॅथीक व्यावसायीकांच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे प्रवेश प्रक्रीया करीता नोंदणी (Registration) करण्याच्या तारखेत वाढ करण्याबाबत....

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एमएचसी२०१४/प्र.क्र.३०८/१४/शिक्षण-२ दि.१३ ऑगष्ट २०१४
२) विद्यापिठ परीपत्रक क्र.७६/२०२२ दि.०१/०८/२०२२.

उपरोक्त विषयास अणुसरुन होमीओपॅथीक व्यवसायीकांकरीताचे आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र या अभ्यासक्रमाकरीता अर्ज सादर करण्याकरीता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दिनांक ०१/०८/२०२२ रोजी परिपत्रक प्रसिध्द करण्यात आले होते. त्यानूसार ऑन लाईन अर्ज नोदणी करण्याची अंतीम तारीख दि. २२/०८/२०२२ निश्चित करण्यात आली होती.

तथापि, काही विद्यार्थ्यांना ऑन लाईन नोंदणी करण्यात आलेल्या अडचणींचा विचार करता ऑन लाईन नोंदणी करण्याची अंतीम तारीख २२/०८/२०२२ वरुन ०४/०९/२०२२ पर्यत वाढवून देण्यात येत आहे.

तरी संबधितांनी याची नोंद घेवून ऑन लाईन नोंदणी प्रक्रिया दि.०४/०९/२०२२ पर्यत पुर्ण करुन आवेदन पत्र विद्यापीठास दि.०९/०९/२०२२ पर्यत सादर करावेत.

यापुढे सदर अभ्यासक्रमाच्या नोदणी करीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

सही/-
(डॉ.संदीप कडू)
प्र.कुलसचिव